दिनांक ३० व ३१ जानेवारी २०१४ रोजी शं. ना. नवरे नाट्यनगरी, पंढरपूर येथे स्थानिक लोकांसाठी विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात दिनांक ३० जानेवारी २०१४ रोजी विनय आपटे रंगमंच (मुख्य रंगमंच) येथे अद्वैत थिएटर निर्मित 'गाढवाच लग्न' हे नाटक सादर करण्यात आले. दिनांक ३१ जानेवारी २०१४ रोजी स्थानिक शाखेचे कार्यक्रम व सतीश तारे रंगमंच (रखुमाई सभागृह) येथे सायं. ७.०० वा. सरस्वती थिएटर निर्मित व दिशा थिएटर प्रकाशित 'पाऊले चालती पंढरीची वाट' हे नाटक सादर करण्यात आले.

## शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी २०१४

नाट्यदिंडीचे मुख्य रंगमंचावर आगमन झाल्यानंतर मा. ना. श्री. सुशिलकुमार शिंदेसाहेब, केंद्रीय गृहमंत्री यांच्या शुभहस्ते संमेलनाचे उद्‌घाटन संपन्न झाले. त्यानंतर संमेलनाध्यक्ष मा. डॉ. मोहन आगाशे यांनी नियोजित संमेलनाध्यक्ष मा. श्री. अरूण काकडे यांच्याकडे संमेलनाध्यक्ष पदाची सूत्रे सोपविली.

दुपारी ३.०० वा. 'अभिरूप न्यायालय', सायं. ५.०० वा. 'पंढरीचा राजा' हा नाट्यसंगीताचा कार्यक्रम तसेच सायं. ६.०० वा. 'स्वर अमृताचे' हा श्री. आनंद भाटे यांच्या गायनाचा कार्यक्रम पार पडला. सायं. ७.३० वा. सोनिया परचुरे यांचे कथ्थक नृत्य व रात्री ८.०० वा. 'कलावंत रजनी' हा बहुरंगी व बहुढंगी कार्यक्रम नाट्य कलाकारांनी सादर केला. त्याचदिवशी सतीश तारे रंगमंचावर विविध एकांकिका व रात्रौ. ९.०० वा. 'संगीत प्रितीसंगम' हे नाटक मुंबई मराठी साहित्य संघातर्फे सादर करण्यात आले. गो. पु. देशपांडे रंगमंचावर (संत तनपुरे महाराज मठ) विविध बालनाट्य, आविष्कार निर्मित नाटक 'संगीत बया दार उघड' सादर झाले. तसेच रात्रौ ९.०० वा. 'दशावतार' हा लोककलांचा कार्यक्रम सादर झाला.

## रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०१४

सकाळी १०.०० वा. हॉटेल विठ्ठल इन येथे विषय नियामक समितीची सभा झाली.

मुख्यमंचावर सकाळपासून नाट्यपरिषदेच्या विविध शाखांचे कार्यक्रम सादर करण्यात आले. सायं. ५.०० वा. खुले अधिवेशन आणि नाट्य संमेलनाच्या समारोपाचा कार्यक्रम पार पडला.

रात्रौ. ८.०० वा. ग्रेट मराठा एंटरटेनमेन्ट कंपनी प्रा. लि. आश्वमी थिएटर निर्मित 'करून गेलो गांव' हे आठ मालवणी अवलीयांचे नाटक सादर करण्यात आले.